# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.सआ/एफ/उत्तर/५३७७/अति. निर्मू. दिनांक.२०.०५.२०२२

## जाहीर सूचना

विषय : एफ/उत्तर विभागातील अतिक्रमण निर्मुलन वाहनांवर काम करण्याकरीता हंगामी कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (NGO) मार्फत पुरवठा करण्यासंबंधी जाहीर सूचना.

सदर सुचनेव्दारे नोंदणीकृत अशासकीय संस्थांना (NGO) कळविण्यात येते की, एफ/उत्तर विभागातील अतिक्रमण निर्मुलन वाहनांवर काम करण्याकरीता खालील अटींनुसार हंगामी कंत्राटी कामगार पुरविण्याबाबत आपले अर्ज (नोंदणी प्रमाणपत्र व अनुभव इ. कागदपत्रांसह) सहाय्यक आयुक्त 'एफ/उत्तर विभाग यांचे कार्यालय, वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन), ९६, भाऊदाजी रोड, माटुंगा (पूर्व),मुंबई – ४०० ०१९. येथे दि.**३०.०५.२०२२** रोजी दुपारी **३.००** वाजेपर्यंत सीलबंद पेटीत टाकावेत. सोडत त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता काढण्यात येईल.

अशासकीय संस्था (NGO) यांनी निम्नलिखित बाबी विचारात घेऊन आपल्या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) सदर कामाकरिता स्थानिक एफ/उत्तर विभागातील अशासकीय संस्थांनी अर्ज करावेत.

२) दि.०१.०६.२०२२ ते दि. ३०.११.२०२२ या ६ महिन्यांकरिता ६ कंत्राटी कामगार पुरविणे.

३) प्रति दिन प्रति कामगार रु. ६७९.२३ इतके वेतन + ४९.५८% लेव्ही परिपत्रक क्र. प्रकाअ/०८/२०२१-२०२२ दि.२५.१०.२०२१ अटींच्या पूर्ततेनंतर (प्रतीपुर्ती स्वरूपात) अधिदान देण्यात येईल.

४) एफ/उत्तर अतिक्रमण निर्मुलन विभागातील अधिका-यांच्या सूचनेनुसार फेरीवाला निष्कासन कामाकरिता सक्षम कामगारांचा पुरवठा करणे.

५) कामगार पुरवठा केलेल्या बिलाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमानुसार आवश्यक पडताळणी व लेखा परीक्षणानंतर विभागीय सांकेतांक २२०८००४०० या लेखा शिर्षातून संबधित संस्थेला ECS/NEFT व्दारे अधिदान केले जाईल.

६) बालकामगार पुरवठा करणे निषिद्ध आहे.

७) अशासकीय संस्था (NGO) यांनी एफ/उत्तर विभागातील नोंदणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशील, मागील आर्थिक वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

८) वरील अटींचे पालन न करणा-या , समाधानकारक काम न करणाऱ्या अशासकीय संस्था (NGO) यांचेकडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरित थांबविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त एफ/उत्तर यांचे असतील.

९) अशासकीय संस्था (NGO) यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून लॉटरीपद्धतीने पात्र अशासकीय संस्था (NGO) यांची निवड करण्यात येईल.

१०) रु. १०० किंमतीच्या स्टँम्प पेपरवर हमीपत्र सोबत जोडण्यात यावे.

११)सदर योजनेत अर्ज करणा -या स्थानिक अशासकीय संस्थेने म.न.पा. नियमावली नुसार रु. ११००/- + १८% वस्तू व सेवा कर असे एकूण रु. १२९८/- इतक्या रक्कमेने इच्छापत्र/अर्ज फी भरण्यात यावी.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'एफ/उत्तर' विभाग**